• महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका •

International Innovative Journal Impact Factor ((IIJIF) 2.283




अथर्व पब्लिकेशन्स्

ISSN 2347-9639

Visit us... www.atharvapublications.com

Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 11 | No - 2 | Issue - 36 | May-Aug. 2023 | ISSN-2347-9639

# VICHAR MANTHAN

IIJIF Impact Factor 2.283

National Research Journal of Political Science and Public Administration

(Peer Reviewed Journal)



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

संपादक

प्राचार्य डॉ. प्रमोद पवार

प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. लियाकत खान । डॉ. विठ्ठल दहिफळे

प्राचार्य डॉ. विलास आघाव । डॉ. संजय वाघ । डॉ. संभाजी पाटील । डॉ. वकार शेख

Scanned with CamScanner

# * अनुक्रमणिका *


१. **महाराष्ट्राची राजकीय संस्कृती – एक दृष्टीक्षेप** ........ ११
*प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे*

२. **आपत्ती व्यवस्थापनातील राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका** ........ १५
*प्रा. डॉ. संतोष शिवकुमार खत्री*

३. **अत्याधुनिक तंत्रज्ञान : लोकशाही आणि निवडणुका** ........ १८
*प्रा. डॉ. कदम एच. पी.*

४. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय स्त्री मुक्ती चळवळीतील योगदान** ........ २१
*प्रा. डॉ. एस. एम. वाघ*
*ज्योती श्रीराम डोंगरे*

५. **शंकररावजी चव्हाण – एक प्रेरणादायी नेतृत्व** ........ २५
*प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे*

६. **महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते प्रवाह** ........ २८
*प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण*
*पडोळे कोंडीबा रमेशराव*

७. **महाराष्ट्रातील मराठा वर्चस्व/धुरिणत्व व आरक्षणाचे राजकारण** ........ ३४
*निखिल गणेश जगताप*
*डॉ. महादेव बेलखेडे*

८. **भारतातील पक्षीय राजकारण** ........ ३९
*सतीश गणपतराव उढाण*

९. **भारतीय लोकशाहीत नागरी समाजाची भूमिका** ........ ४४
*डॉ. अर्जुनजी. येरगे*

१०. **महाराष्ट्रातील संमिश्र सरकारे आणि नवी राजकीय समीकरणे** ........ ४८
*प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे*

११. **भारतीय संविधानातील लोकशाही मूल्य व आजची वास्तवता** ........ ५३
*प्रा. डॉ. के. जी. पोकळे*
*प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे*

१२. **भारतीय राजकिय लोकशाहीचे सामाजिक लोकशाही संक्रमण : एक विवेचनात्मक अभ्यास** .. ५८
*प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण*
*प्रा. शाजी सहदेवन*

१३. **सहभागी लोकशाहीचा सिद्धांत** ........ ६१
*सहा. प्रा शरद विठ्ठल पाटील*




Scanned with CamScanner

१४. **राजकीय प्रक्रियेत सोशल मीडियाची भूमिका** ....................................... ६७
*प्रा. डॉ. बोडके पंचफुला रामराव*

१५. **स्थानिक शासन संस्थेतील माहिला नेतृत्व** ....................................... ७२
*श्री. निरंजन केशवराव पतंगे*
*प्रा. डॉ. व्हि. आय. पाटील*

१६. **भारतीय लोकशाही समोरील राजकीय आव्हाने** ....................................... ७६
*प्रा. डॉ. रमेश गंगाराम खैरनार*

१७. **एक दलीय व्यवस्था के पुनरुद्धार का युग** ....................................... ७८
*प्रो. डॉ. संतोष शिवकुमार खत्री*

१८. **A study of Dr. BabasahebAmbedkar's Contribution to the Welfare of Women...... 81**
*Dr. Anil Kashinath Salunke*

१९. **Minorities in India : Status, Issues, Constitutional Safeguards & Governmental Assistance Programs : An Analytical Study........................................ 85**
*Mr. Shaikh Moeen*
*Shaikh Naeem*

२०. **Israel Palestine Conflict : An Overview........................................................ 93**
*Dr. Nandkishor Nanasaheb Ugale*
*Miss. Kanchan Ravindra Ghumatkar*

२१. **Soft Power Assets of India........................................................................ 97**
*Pradip Jankar*
*Dr. Digambar Biradar*

२२. **Jamaate Islami Hind - A Democratic Movement in India ........................................ 101**
*Dr.Viqar R..Shaikh*



Scanned with CamScanner

# *भारतीय संविधानातील लोकशाही मुल्य व आजची वास्तवता*

प्रा.डॉ.के.जी.पोकळे

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा, ता.जि. बीड

प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे ,

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

अ.र.भा.गरुड महाविदयालय शेंदुर्णी ता.जामनेर जि.जळगांव

---

## सारांश:

भारतीय संविधान आणि संविधानातील लोकशाही मुल्याचा आढावा घेत असतांना भारतीय संविधानाची निर्मिती कोणत्या परिस्थितीत झाली आहे व त्या संविधानामध्ये लोकशाहीच्या संवर्धनासाठी कोणती मुल्य आवश्यक आहेत याचा सर्वप्रथम आढावा घेणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारतीय संविधानाची निर्मिती व संविधानातील लोकशाही मुल्य याचा सद्यस्थिच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला आहे.

कोणत्याही देशाची राज्यघटनाही त्या देशाच्या विकासातून निर्माण होत असते, 150 वर्षानंतरच्या प्रदिर्घ लढ्यानंतर भारताला इंग्रजांच्या जुलमी राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले आणि या स्वातंत्र्याचा फायदा सर्व सामान्य घटकापर्यंत पोहचविण्यासाठी भारतातील समाजसुधारक व तत्कालीन काळातील स्वातंत्र्य योध्दे यांनी प्रयत्न करुन राजकीय स्वातंत्र्यारोबर सामाजिक व बौध्दीक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संविधान निर्माण करावयाचे ठरले व संविधान निर्मितीची जबाबदारी प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरती सोपविण्यात आली.

2 वर्ष 11महिने 18 दिवसाच्या प्रदिर्घ काळानंतर भारताची राज्यघटना पुर्णत्वास आली.व या लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व न्याय हे तत्व केंद्रबिंदु मानून सर्वसामान्याचा विकास कसा होईल यासाठीचे मूल्य अंतभूर्त करण्यात आली.लोकशाही हा लोककेंद्रित शासन प्रकार आहे.यामध्ये लोकांच्या हक्क व अधिकाराचे जतन होणे महत्वाचे असते.असे असले तरी स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षाच्या काळात भारतातील लोकशाही ही केवळ कागदावरच आहे की काय असे सर्वसामान्यांना वाटते. त्यादृष्टीने भारतीय संविधान व आजची भारतातील लोकशाही व्यवस्था याचा अभ्यास वास्तववादी दृष्टीकोनातून करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

- ## शोधनिबंधाची उदिष्टये-

1) **भारतीय संविधानातील लोकशाही मुल्यांचा आढावा घेणे.**
2) **भारतीय लोकशाहीतील बदलते मुल्य व आवश्यक बदलांचा आढावा घेणे.**
3) **भारतीय संविधानातील  महत्वाच्या घटकांचा आढावा घेणे.**
4) **भारतीय संविधानाचे आधुनिक काळातील महत्व व वास्तवता स्पषट करणे.**
5) **भारतीय लोकशाहीची आजची वास्तवता स्पष्ट करणे.**

**प्रस्तावना**- (Introduction) :-

**स्वातंत्र्यपूर्व काळातील इंग्रजांविरुध्दच्या जूलमी कारभाराविरुध्द भारतातील स्वातंत्र्य योध्दांनी केलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाची परिणीती म्हणूनच** 15 **ऑगष्ट** 1947 **साली भारताला स्वातंत्र्य मिळाले.**9 **ऑगष्ट** 1942 **च्या चलेजाव चळवळीने संपूर्ण देश ढवळून निघाला व इंग्रजांच्या साम्राज्याला हादरे बसले. इंग्रजांना असे वाटले की, आता आपल्याला भारतातून गेल्याशिवाय पर्याय नाही. याच दृष्टीने त्यांची उदामतवादी भूमिका भारताच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने सुरु झाली. व भारताला स्वातंत्र्य मिळाले.हे सर्व घडत् असतांना स्वातंत्र्यानंतर भारतात कोणती राजकीय व्यवस्था महत्वपूर्ण ठरेल या दृष्टीने भारतीय नेत्याच्या मनात विचारांची चलबिचल सुरु झाली. म.गांधी , पं.नेहरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सारख्या अनेक नेत्यांनी भारताच्या भविष्यकालीन विकासाचे स्वप्न लोकशाही व्यवस्थेच्या माध्यमातून बघीतले होते. आणि ही लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी व तीचा फायदा सर्वसामान्य घटकाला होण्यासाठी या लोकशाहीचा आराखडा निश्चित करणारे संविधान महत्वाचे होते. त्यादृष्टीने** 9 **डिसेंबर** 1946 **साली कॅबिनेट मिशनच्या योजने  नुसार डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीची निर्मिती झाली.**

**मसुदा समितीची स्थापना** 29 **ऑगष्ट** 1947 **साली झाली. व डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष झाले .एकुण** 7 **सदस्य असणाऱ्या मसुदा समितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे घटना निर्मितीतील योगदान लक्षात घेता त्यांना घटना निर्मितीचे शिल्पकार म्हटले जाते.**

**भारतीय घटना समितीच्या व मसुदा समितीच्या माध्यमातून** 2 **वर्ष्** 11 **महिने** 18 **दिवस हे कामकाज चालले व** 26 **नोव्हेंबर** 1949 **ला हे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तुत्वातून व ज्ञानी लेखनीतून पुर्णत्वास आले.**

**घटनेतील** 395 **कलम** 8 **परिशिष्टे व** 22 **भाग हे भारताच्या लोकशाहीत शासन व्यवस्थेचे आधार ठरले. कारण भारतीय संविधानाच्या आधारावर भारताची लोकशाही उभी करण्याचा आटोकात प्रयत्न घटनाकारांनी केला आहे. कारण राजकीय स्वातंत्र्य बरोबरच सामाजिक व बौध्दीक स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी भारतीय संविधान महत्वाचे होते.**

असे असतांना भारतीय घटनेत जनतेच्या हक्क व अधिकार तसेच कर्तव्याचा समावेश सविस्तर करण्यात आला व शासन कशाप्रकारे निर्माण होईल. व शासनाची जबाबदारी काय असेल यांची आचारसंहिता भारतीय संविधानाने निश्चित केली आहे.

असे असले तरी स्वातंत्र्याच्या 75 वर्षाचा प्रदिर्घ काळात आज भारतीय संविधान व भारतीय लोकशाही याची वास्तवता व्यक्त आहे. याचा विसर भारतीय जनते बरोबरच राजकीय व्यवस्थेतील प्रमुख घटकांना पडला आहे की काय असा प्रश्न निर्माण होत आहे. या दृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय संविधान व भारतीय लोकशाही याच्या वास्तविकतेचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

- **भारतीय संविधान व लोकशाहीचे स्वरुप**

1. **व्याख्या – ऑस्टीन**

**"शासन संस्थेची रचना निश्चित करणारे नियम म्हणजे संविधान होय."**

2. **के.सी.व्हीयर**

**"ज्या तत्वावर शासन संस्थेची स्थापना झाली आहे. व ज्या तत्वानुसार शासन संस्थेचे नियंत्रण होते ते तत्वे म्हणजे संविधान होय "**

या व्याख्यान वरुन शासन संस्थेत संविधानाचे महत्व किती आहे हे लक्षात येते.

- **लोकशाही**

1. **व्याख्या – अब्राहम लिंकन**

"लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालवले जाणारे शासन म्हणजे लोकशाही होय."

2. **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**

"कोणत्याही रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक व सामाजिक जिवनात क्रांतीकारी बदल घडून आणणाऱ्या शासन व्यवस्थेस लोकशाही म्हणतात."

अशा रितीने वरील व्याख्येवरुन आपणास भारतीय संविधान व भारतीय लोकशाही यांच्यातील मूल्य परस्परांकडून पुरक असल्याचे दिसून येते. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन व अनेक देशाच्या राज्यघटनेतील काही तत्वांचा समावेश भारतीय संविधानात करुन् उदा. संसदीय शासन – इंग्लड, संघराज्य पध्दती – कॅनडा, अमेरिका मुलभूत हक्क – फ्रांस, अमेरिका, मार्गदर्शक तत्वे – आयर्लंड, मुलभूत कर्तव्य – रशिया, घटना दुरुस्ती- द.आफ्रिका , आणिबाणि – जर्मनी , समाजवाद- रशिया , कायदयाचे राज्य – इंग्लंड व न्यायालयीन पुर्नविलाकन - अमेरिका, अशा तत्वांचा समावेश घटनेत करुन संविधान निर्माण केले

आहे. या बरोबरच स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व या तत्वाच्या आधारावर लोकशाहीची उभारणी झाली पाहीजे असे सुचविले आहे.

- भारतीय संविधानातील लोकशाही रक्षणाच्या दृष्टीने महत्वपुर्ण तरतुदी:-

भारतीय संविधानाने लोकशाहीच्या रक्षणासाठी प्रयत्न करुन् काही महत्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत.

भारतीय नागरिकास समतेच्या पातळीवर मूलभूत हक्क व अधिकार – कलम 12 ते 35

1. भारतीय नागरिकांचे कर्तव्य – कलम 51 अ.
2. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे – कलम 36 ते 51.
3. भारतीय संघराज्य पध्दतीची व्याख्या कलम 1
4. लोकप्रतिनिधीची निवड प्रक्रिया व आचार संहिता कलम 332
5. भारतीय संसदेची रचना व कार्य कलम 79
6. घटना दुरुस्तीची प्रक्रिया . कलम 368
7. निवडणूक आयोग व निवड पध्दती 324 ,

या सर्व तरतुदीच्या माध्यमातून भारताची लोकशाही संविधानाच्या चौकटीत राहून कार्य करेल याची दक्षता संविधान निर्माण करतांना घटना समिती व मसुदा समितीने घेतली आहे. असे असतांना देखील भारताच्या या लोकशाही व्यवस्थेत भारतीय नागरिकांना संविधानाचा विसर पडल्यामुळे भारतीय लोकशाहीचा ढाचाच बदलतांना दिसत आहे.कारण लोकशाही साठी घटनेने घालुन दिलेले नितीतत्वाचे पालन सर्वांकडून होणे गरजेचे असते हे आजच्या काळात दिसत नाही. प्रत्येक जण संविधानातील तरतुदीचा अर्थ आपल्याप्रमाणे लावत आहे. आणि त्यामुळे भारतीय लोकशाही लोककेंद्रित न होता साम,दाम, दंड, भेद, निती असणाऱ्यांच्या दावणीला बांधली जात असल्याचे दिसत आहे.कारण लोकशाही हे केवळ सरकार नसुनती एक सामाजिक संघटना आहे. त्यासाठी संविधानाचे पालन होणे हे अतिशय गरजेचे आहे कारण डॉ.बाबाबसाहेब आंबेडकर यांचा जिवन संघर्ष हा सामाजिक लोकशाहीसाठी होता व ही लोकशाही सबळ करण्यासाठी त्यांनी संविधान निर्माण केले आहे.

* लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक घटक-

1.स्वातंत्र्य 2. समता 3. न्याय. 4 बंधुता 5. बहुमताचे शासन 6. प्रौढ मताधिकार 7. जबाबदार शासन 8 . धर्मनिरपेक्षता. 9. समाजवाद 10 . मुलभूत हक्क व अधिकार 11. कर्तव्य, 12. जबाबदार शासन पध्दती.

या सर्व घटकांच्या  आधारावर खरी लोकशाही अस्तिवात येते. हे ओळखून भारतीय संविधानात या तत्वाचा समावेश करण्यात आला आहे. परंतु कालांतराने राजकीय व सामाजिक पटलावर या तत्वांचा विसर बऱ्याच प्रमाणात पडत असल्यामुळे लोकशाही ही केवळ एक शासन व्यवस्थाच आहे का काय ?  असा प्रश्न सातत्याने भेडसावत आहे.

- **लोकशाहीची सद्यस्थिती**

आज भारतीय लोकशाहीची वास्तवता लक्षात घेता असे दिसते की, स्वातंत्र्यानंतर भारतात लोकशाही व्यवस्था निर्माण करुन् सर्वसामान्य जनतेचा हक्क आणि अधिकाराचे रक्षण करण्याचा प्रयत्न झाला. परंतु आज भारतीय लोकशाहीचे चित्र् त्याच्या उलटे दिसत आहे कारण यामध्ये सर्व सामान्य जनतेचा विचार न होता साम, दाम, दंड, भेद, नितीचा अवलंब करणाऱ्यांचेच राज्य व राजकीय सत्ता दिसत आहे.

**आधुनिक काळातील लोकशाहीला लागलेले कलंक.**

1. राजकारणाचे गुन्हेगारीकरण
2. भ्रष्टाचाराचे लोकशाही वरील सावट
3. अल्पसंख्यांकाचे राजकारण
4. अल्पमताचे राजकारण
5. निवडणूकीच्या माध्यमातून वेळ व पैशाचा अपव्यय
6. केवळ सत्ताकेंद्रि राजकारण
7. दहशतवादातून स्वातंत्र्याची गळचेपी
8. पैसा केंद्रित निवडणूक पध्दत
9. दलबदलू नेतृत्व

- **लोकशाही समोरिल ज्वलंत आव्हाने**

1. **धर्मांधतेचे आव्हान**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली लोकशाहीची संकल्पना ही भांडवलशाही लोकशाही किंवा समाज प्रणाली यापेक्षा वेगळी होती कारण डॉ.आंबेडकर यांना सामाजिक कल्याणाची लोकशाही हवी होती. ती आज मात्र् दिसत नाही. तर आज भारतात धार्मिक किंवा वांशिक गटाच्या नावाखाली अतिरेकी चळवळ निर्माण होतांना दिसत आहेत . हे भारतीय लोकशाहीला आव्हान आहे.

## लोकशाहीलाधोका पोहचविणारी जातीव्यवस्था

भारतातविषमतेवर आधारीत जातीव्यवस्था निर्माण झाली आहे. ज्यामध्ये उच्च् –निच्च्,श्रेष्ठ –कनिष्ठ यांचा विचार केला जातो व यामध्ये सर्वसामान्य जामीतील लोकांना सत्तेची किंवा विकासाची फळे चाखता येत नाहीत. तर जातीकेद्रिंय राजकारण झाल्यामुळे ज्यांचे संख्याबळ अधिक त्यांचीच सत्ता व त्यांचाच विकास असे चित्र आज लोकशाहीला धोकादायक आहे.

## 2. जाचक चालीरिती

लोकशाही यशस्वी रितीने चालावयाची असेल तर पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे समाजरचनेत कडक बंधने नसावीत .ढवळाढवळीत सामाजिक असमानता असु नये . समाजात भरडले जाणारे वर्ग असू नयेत. कारण या सर्व बाबी लोकशाहीच्या तत्वांशी विसंगत आहेत. समाजाच्या सर्व घटकांकडे समतेने व आदराने पाहण्याची वृत्ती समाजात असली पाहिजे . हे चित्र् आज दिसत नाही हा लोकशाहीला धोका आहे.कारण वर्ग विभक्त समाज रचना हा लोकशाहीला प्रतिकुल असते. याची जाणीव आंबेडकरांना होती. म्हणूनच त्यांचा या घटकांना विरोध होता.

## 3. गुन्हेगारांचे राजकारण

लोकशाहीमध्ये सर्वसामान्य जनतेला प्रामुख्याने स्थान असले पाहिजे तरच खरी लोकशाही निर्माण होवू शकते. परंतु आज 21 व्या शतकात नितीमुल्याची जाण असणारे लोक लोकशाहीच्या प्रक्रीयेतून बाहेर फेकले जातात व ज्यांना नितीमुल्य किंवा राजकीय नितिमत्ता नाही . आणि ज्यांचे गुन्हेगारी प्रवृतीचे राजकारण आहे अशाच लोकांचा आज लोकशाहीमध्ये विजय होतांना दिसतो आहे. त्यामुळे आज राजकारणाचे गुन्हेगारीकरण किंवा गुन्हेगाराचे राजकारण असे समिकरण झाल्याचे दिसते. त्यामुळे सर्व सामान्य माणूस लोकशाहीतील मतदान प्रक्रियेतून बाहेर पडतो आहे व राजकीय उदासीनता निर्माण होत आहे हा लोकशाहीला खुप मोठा धक्का आहे

## 5. राजकारण व पैसा यांचे समिकरण

खरी लोकशाही ही योग्य मतावर अवलंबुन असते व ती लोकशाही टिकुन राहते आज मात्र् राजकारण व पैसा हया एकाच नाण्याच्या दोन बाजु झाल्यामुळे राजकारणात पैसा असेल तर विजय मिळविता येतो असे झाल्यामुळे अमाप पैसा खर्च होतो व जो पैसा विकास कामावर खर्च व्हावयास पाहिजे ते होत नाही. पैश्याच्या जोरावर लोकशाही प्रक्रियेत निवडून आलेले लोक प्रतिनिधी विकास कामा ऐवजी भ्रष्टाचाराकडे वळतात व धनिकांची लोकशाही होते.पैशांच्या जोरावर मते विकत घेतले जातात व जी व्यक्ती लायक नसते ती यामध्ये निवडून येते.

## 6. राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी

लोकशाहीचा आत्मा हा लोक असतो आणि यामध्ये व्यक्ती स्वातंत्र्य महत्वाचे असते.व्यक्ति स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी भारतीय स्वातंत्र्ययोध्दांनी  लढा दिला. व स्वातंत्र्य मिळविले.  परंतु आज मात्र् सर्वसामान्य माणूस किंवा महिला वर्ग यांना मुक्तपणे आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत नाही. घराच्या बाहेर पडल्यानंतर गुंडगिरी , प्रवृत्ती, धाकदडपशाही प्रवृत्तीचे लोक आजही स्त्रियांच्या अब्रूचे लचके तोडतात, आज बलात्काराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यातून स्त्रिस्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा प्रश्न सातत्याने निर्माण होतांना दिसतो आहे.हे लोकशाहीच्या चौकटीत न बसणारे चित्र लोकशाहीला संपवणारेच आहेत.

## 7. केवळ संख्याबळाचे राजकारण व बुध्दीमत्तेला थारा नाही.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत बहुमताला महत्व् व बहुमताचे शासन याला महत्व् आहे. परंतू आज मात्र हे बहुमत  किंवा संख्याबळ केवळ पैशाच्या व सत्तेच्या अमिषाच्या जोरावर मिळविली जाते, त्यामुळे आजची लोकशाही ही केवळ संख्या बळावर आहे. यासंख्याबळामध्ये बौध्दीक व्यक्तिचा समावेश अत्यंत अल्प्प्रमाणात दिसतो. त्यामुळे आजची लोकशाही ही सक्षम न बनता दुबळी होत चालली आहे.

## 8.अल्पमताचे शासन व दलबदलु नेतृत्व

आज भारतीय लोकशाहीत दलबदलु नेतृत्वाची निर्मिती झपाट्याने होत आहे.याबरोबरच भारतीय लोकशाहीतील खर शासन हे बहुमताचे व एकच राजकीय पक्षाचे असले पाहिजे तरच ते खऱ्या अर्थाने बहुमताचा शासन होवू शकते. परंतु आजची परिस्थिती याउलट झाली आहे. कोणतेही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळत् असल्यामुळे  दोन / तीन किंबहुना या पेक्षाही अधिक राजकीय पक्ष मिळून देशात व राज्यात सरकार स्थापन होत आहे. उदा. महाराष्ट्रात तीन पक्षाचे मिळून सरकार स्थापन झाले यापूर्वी अशा विभिन्न  राजकीय विचाराच्या पक्षाची सरकारे कधी स्थापन झाली नव्हती.राष्ट्र हिताच्या दृष्टीने हे ठिक असले तरी लोकशाहीच्या दृष्टीने ते संयुक्तीक होत नाही .किंवा लोकशाहीच्या चौकटीत बसत नाही. यासारख्या अनेक समस्या भारतीय लोकशाहीमध्ये दिवसेंदिवस निर्माण होवून लोकशाहीची मुळ संकल्पना लोप पावत आहे .आणि मुठभर लोकांचे कल्याण या व्यवस्थे मध्ये होतांना दिसत आहे.विविध प्रकारचे कायदे संसद व कायदे मंडळा केले जातात. परंतू या कायद्यांची अंमलबजावणी मात्र प्रामुख्याने सर्वसामान्य पातळीवर होत नाही त्यामुळे सर्व सामान्य जनता नाराज होऊन त्याचा परिणाम लोकशाहीतील सहभागावर होतो. आणि राजकिय उदासिनता निर्माण होऊन ज्या लोकशाहीमध्ये जास्तीत जास्त् लोक सहभागी व्हायला पाहिजे तसे होत नाही. आणि त्याचा परिणाम अकार्यक्षम व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना राजकारणात निवडून येण्याची संधी मिळते.

अशा रितीने आजची लोकशाही ही सत्ता, पैसा व स्वार्थ केंद्रित झाल्यामुळे अनेक राजकीय पक्ष व नेतृत्व निर्माण होतांना दिसत आहे हे लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने धोकादायक आहे.

- **निष्कर्ष –**

अशा रितीने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय संविधानातील लोकशाही मुल्य  व भारतीय लोकशाही याची वास्तवता बघितली तर असे दिसते की ज्या संविधानाने भारतीय लोकशाहीला काही नियमांच्या आराखडयात बसविलेले होते ते नियम आता भारतातील काही घटक म्हणजे च ज्याच्याकडे साम, दाम, दंड , भेद आहे असा वर्ग विसरत चालला आहे आणि त्यामुळे त्याचा वास्त्विक तोटा सर्व सामान्य  जनतेला बसत आहे.त्यासाठी भारतीय संविधानाचा जागर सर्वच पातळीवर होऊन त्याचे पालन होणे गरजेचे आहे आणि या पालनाबरोबरच लोकशाहीतील  मुल्यांचा जागर देखिल सर्वच पातळीवर होऊन त्याप्रमाणे भारतातील जनतेने आचरण करणे गरजेचे आहे तरच भारताच्या महासत्तेचे स्वप्न साकार होऊन म.गांधी, पं.नेहरु, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा भारत व सामाजिक लोकशाहीच्या आधारावर भारतीय व्यवस्थेची निर्मिती होईल. हे आपणास विसरता येत नाही.

- **संदर्भ-**


1. राजेंद्र व्होरा आणि सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लीकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2010
2. सुरवाडे दिलीप, लोकशाही एक चिंतन, लोकसाहित्य प्रकाशन , औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 1 मे 2010
3. भारताचे संविधान , भारत सरकार विधी व न्यायमंत्रालय 2011.
4. नलवाडे पंडित, भारतापुढील आव्हाने आणि सद्यस्थिती, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती-1 मे 2011.
5. प्रा.बी.बी..पाटील , लोकप्रशासन , फडके प्रकाशन कोल्हापूर 2008
6. देशमुख आलका, एकविसाव्या शतकातील बदलते समाजकारक आणि राजकारण, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, पहिली आवृत्ती सप्टें 2010.
7. कुलकर्णी सुधाकर – भारतीय शासन आणि राजकारण, विद्याबुक पब्लिशर्स, औरंगाबाद, सुधारित आवृत्ती जून 2012.